# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 November 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध, लाडकी बहिण योजनेची रक्कम वाढवण्याचं आश्वासन
- महाविकास आघाडीचाही महाराष्ट्रनामा जारी, शेती, ग्रामीण विकास, यासह महिला सुरक्षा या मुद्यांवर भर
- फुलंब्रीतल्या दरीफाटा इथं एका दुकानाला लागलेल्या आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू

आणि

- भारत – दक्षिण आफ्रिकेदरम्यान दुसरा टी – ट्वेंटी क्रिकेट सामना आज खेळला जाणार

****

भारतीय जनता पक्षाचा निवडणूक जाहीरनामा पक्षाचे नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज प्रसिद्ध केला. हा जाहीरमाना शेतकऱ्यांचा सन्मान, आणि गरीबांची सेवा करणारा, युवकांना रोजगाराच्या नव्या संधी देणारा आणि महिलांचं सक्षमीकरण करणारा असा असल्याचं, शहा यांनी सांगितलं. लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम दीड हजार रुपयांवरून एकवीसशे रुपये करणार, महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांचा पोलिस दलात समावेश केला जाणार, शेतकऱ्यांना कर्जमाफी, २५ लाख रोजगारांची निर्मिती, अशी अनेक आश्वासनं या जाहीरनाम्यात दिली आहेत. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत अधिक माहिती दिली –

***ज्याच्यामध्ये लाडक्या बहिणींना पुढच्या काळामध्ये पंधराशेच्या ऐवजी एकवीसशे रूपये देण्याचा आमचा संकल्प आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा आमचा संकल्प आहे, कारण शेतकऱ्यांना आम्ही ऑलरेडी मोफत वीज दिलेली आहे. पण शेतकऱ्यांची कर्जमाफी आम्ही करतो आहोत. आणि त्यासोबत आम्ही भावांतर योजना आणतो आहोत.***

महाविकास आघाडीची अनेक आश्वासनं प्रत्यक्षात उतरणारी नसल्याची टीका शहा यांनी केली. खोटं फार काळ टिकत नसल्यामुळेच २०२२ साली महाविकास आघाडीचं सरकार कोसळल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. खासदार पियुष गोयल तसंच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.
दरम्यान, शहा यांनी आज जळगाव, मलकापूर इथं जाहीर सभा घेत महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला.

****

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज मुंबईत विधानसभा निवडणुकीसाठीचा महाविकास आघाडीचा जाहीरमाना, महाराष्ट्रनामा या नावाने प्रकाशित केला. मुंबईत जाहीर केलेल्या पंचसूत्री कार्यक्रमावर आधारित हा सविस्तर जाहीरनामा प्रकाशित करत असल्याचं खर्गे यावेळी म्हणाले. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, खासदार संजय राऊत उपस्थित होते. या महाराष्ट्रनाम्यात शेती आणि ग्रामीण विकास, उद्योग आणि रोजगार, पर्यावरणावर आधारित शहर विकास या मुद्यांवर आश्वासनं देण्यात आली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार वंदना चव्हाण यांनी याबाबत अधिक माहिती दिली.

***महिलांसाठी विशेषकरून महालक्ष्मी योजना, मोफत बस, सहा गॅस सिलेंडर पाचशे रुपयांमध्ये, पण महाराष्ट्रातल्या भगिनींना आम्हाला निर्भय करायचं आहे. आणि स्वावलंबी करायचं आहे. त्यासाठी विशेषकरून तरतूद केलीय. त्याचप्रमाणे सेफ्टी ऑडीट शाळांमध्ये व्हावं यादृष्टीनं एक नवीन संकल्पना त्याठिकाणी मांडलीये.***

****

निवडणुकीला अवघे दहा दिवस शिल्लक राहील्यानं सर्वत्र जोमाने प्रचार सुरु आहे. आज सुट्टीचा दिवस असल्याने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्व राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी पदयात्रा, जनसंवाद आणि सभा घेण्यावर भर दिल्याचं दिसून आलं. औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी आज पदयात्रा काढली होती. याच मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार लहु शेवाळे यांच्या प्रचारार्थ काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांची सभा झाली. औरंगाबाद मध्यचे महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांनी आज पदयात्रा काढून जनतेशी संवाद साधला. औरंगाबाद पश्चिम मतदार संघातले माहाविकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांनी देखील घरोघरी जाऊन नागरीकांशी संवाद साधला. एम आय एम पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी आज औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे उमेदवार इम्तियाज जलील यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

****

गंगापूर मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची आज सभा होणार आहे. पवार यांनी धाराशिव जिल्ह्यातल्या भूम परंडा विधानसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी इथं महाविकास आघाडीचे उमेदवार संतोष टारफे यांच्या प्रचारार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा पार पडली.

****

भाजप नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यवतमाळ जिल्ह्यात राळेगाव इथं भाजप उमेदवार अशोक उईके यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. जातीवादी आणि सांप्रदायिक प्रचारापासून दूर रहा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती जिल्ह्यातल्या धारणी इथं भाजप उमेदवार केवलराम काळे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

ठाणे जिल्ह्यातल्या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज रॅलीत सहभागी झाले होते.

****

राज्यात येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी केलं आहे.

**बाईट – वर्षा उसगावकर**

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल यांनी आज नवीदिल्लीत विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. तसंच 'इव्ही अॅज अ सर्व्हिस' अर्थात, 'विजेवरच्या वाहनांची सेवा' या कार्यक्रमाची सुरुवातही त्यांनी केली. या कार्यक्रमाची राजधानी दिल्लीसारख्या प्रदूषण वाढलेल्या शहरांकरता गरज असल्याचं ते म्हणाले. औद्योगिक प्रक्रिया, बांधकाम आणि वाहनांच्या वाहतुकीसारख्या बाबींमुळे प्रदूषण वाढत असल्याचं ते म्हणाले. या प्रत्येक क्षेत्रानं प्रदूषण नियंत्रित ठेवण्याकरता प्रयत्न करण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

****

विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदानाचं कर्तव्य करावं याकरता मतदान जनजागृतीचे कार्यक्रम राज्यात सर्वत्र होत आहेत. निवडणूक आयोग आणि केंद्रीय संचार ब्यूरो तर्फे जनजागृती करणारी वाहनं राज्यातल्या १५ जिल्ह्यांमधे पाठवण्यात आली आहेत. ठिकठिकाणी प्रशासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था संघटनांमार्फत मॅरेथॉन, प्रदर्शन, कार्यशाळा असे कार्यक्रम होत आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सर्व विधानसभा मतदारसंघात उद्यापासून चित्ररथाद्वारे जनजागृतीची मोहीम राबवण्यात येणार आहे. उद्या सकाळी ११ वाजता हा चित्ररथ जिल्हाधिकारी कार्यालयातून रवाना होणार आहे.

रत्नागिरी शहरात मतदार जनजागृतीसाठी आज मॅरेथॉन आयोजित केली होती. पोलीस मैदानातून सुरू झालेल्या या मॅरेथॉनची सांगता भाट्ये समुद्रकिनाऱ्यावर झाली. विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व नागरिकांनी ब्रँड अँबेसेडर म्हणून काम करावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केलं.

****

फुलंब्रीतल्या दरीफाटा इथं काल मध्यरात्री एका दुकानाला लागलेल्या आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले. हे दुकान प्लास्टिक साहित्य विक्रीचं असून, ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याची माहिती आहे. आग लागल्याचं समजताच दुकान मालकानं दुकान उघडलं. त्यावेळी आगीमुळे दुकानात तयार झालेल्या गॅसचा स्फोट झाला आणि त्यात तीन जणांचा मृत्यू झाला. नितीन नागरे, गजानन वाघ आणि राजू पटेल अशी या तिघांची नावं आहेत. या दुर्घटनेतल्या गंभीर जखमी झालेल्या दोघांना छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

****

भारत – दक्षिण आफ्रिकेदरम्यान चार टी – ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज गकेबरहा इथं खेळला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. मालिकेतला पहिला सामना जिंकून भारत एक – शून्यनं आघाडीवर आहे.

****

भारताच्या पंकज अडवाणीनं आय बी एस एफ विश्व बिलियर्ड्स अजिंक्यपद स्पर्धेत 150-अप फॉरमॅटचं विजेतेपद पटकावलं आहे. कतारमधे दोहा इथं झालेल्या अंतिम लढतीत त्यानं इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलचा ४ विरुद्ध २ अशा गुणफरकाने पराभव केला. आयबीएफएसच्या जागतिक बिलियर्डस् स्पर्धेतलं पंकज अडवाणी याचं हे २८वं विजेतेपद आहे. या स्पर्धेत भारताच्या सौरव कोठारी यानं कांस्यपदक मिळवलं.

****

लेखक, कलावंत आणि शिक्षकांनी जातीच्या विचारांपासून दूर राहावं, अशी अपेक्षा नदिष्ट या कादंबरीचे लेखक प्राध्यापक मनोज बोरगावकर यांनी व्यक्त केली आहे. आज बंगळुरू इथं कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेच्या वतीनं डॉक्टर अनुराग लव्हेकर यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. नदिष्ट हे गोदामाईनं माझ्या पदरात टाकलेलं दान आहे, नदी वाहत राहिली तर पुढच्या पिढ्या वाहत राहतील, असं बोरगावकर यांनी नमूद केलं.

****

येत्या १२ नोव्हेंबरला होणाऱ्या कार्तिकी यात्रेच्या सोहळ्यानिमित्तानं पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. मंदिर समितीचं प्रवेशद्वार, मंदिराचं शिखर, सात मजली दर्शन मंडप या ठिकाणी रंगीबेरंगी आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. कार्तिकी एकादशीच्या वारीसाठी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक अशा विविध राज्यांमधून शेकडोंच्या संख्येनं दिंड्या आणि पालख्या पंढरीत दाखल होत असतात.

****